# INTERNATIONAL INDIAN SCHOOL ,DAMMAM

## MIDDLE SECTION ANNUAL EXAM – (2017-18)

**CLASS : VI** **TIME : 3 HRS**

**SUBJECT : MARATHI** **MARKS : 80**

---

**प्र.१ रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.** **(1 X 10 =10)**

१. पास विरुध्दार्थी लिहा .

२. मला आंबा आवडतो .(वाक्य भूतकाळात लिहा.)

३. विजयनगरमध्ये ---------- राज्य करत होते.( कृष्णदेवराय/ रामदेवराय)

४. माझ्या पोटात लोखंड व कोळसा यांच्या ---------- आहेत. (खाणी / पाणी)

५. नाम ओळखा व लिहा. १. मी आणि सीमा बाजारात गेलो.

६. घराला ------------- खांब असतात? ( माकडाचे / लाकडाचे )

७. दप्तराचे ओझे नसेल तेव्हा -------------- .( पाठीवरती / पोटावरती)

८. दवबिंदू होऊनी --------------- गवतावर उतरावे ( पहाटे / रात्री )

९. गुलाबाचे फुल नाजुक आहे . ( विशेषण लिहा.)

१०. काळोख समानार्थी शब्द लिहा.

**Q.2. शब्दार्थ लिहा: (ANY5)** **[5]**

१.अलगद २.जिन्नस ३.रॉकेल ४. चवदार ५. स्वार होणे ६.अफवा

**Q.3. समानार्थी शब्द लिहा: (ANY5)** **[5]**

१.पक्षी २.शाळा ३.सूत ४. गुंड्या ५. सूर्य ६.उडी

**Q.4. विरुध्दार्थी शब्द लिहा: (ANY 5)** **[5]**

१. गडद २.गोड ३.हित ४. पास ५. उतरावे ६.निकृष्ट

**Q.5. लिंग ओळखा : (ANY 5)** **[5]**

१. पक्षी २.निसर्ग ३.गवत ४. माती ५. कुलूप ६.केळे

**Q.6. वचन बदला: (ANY 5)** **[5]**

१. किरणे २.ढग ३.वारा ४. दागिना ५. वाफ ६.कवठ

**Q. 7.खालिल अशुदध शब्द शुदध करा. (ANY 5)** **[5]**

१. उरजा २.नीसर्ग ३.चांदन्यांशी ४. दाबायचि ५. चातुरय ६.मुरती

**Q. 8 अर्थ सांगुन वाक्यात उपयोग करा.** **[2]**

१. मिष्कील २. भास ३. तरंगत

**Q. 9 खालील उतारा वाचा नाम व सर्वनाम ऑळखा व लिहा.** **[5]**

राज आणि राम दोघे मित्र आहेत. ते दोघे चांगले क्रिकेट खेळतात.त्यांचा मित्र रहीम आहे.तो उत्तम गायक आहे.ते तिघे आज मुंबईला जुहू बिचवर गेले. तिथे राधा भेटली.ती पण उत्तम गाण म्हणते.

**Q. 10 काळ ओळखा व लिहा.** **[5]**

१.माया खोखो खेळते.

२.राज पत्र लिहिणार.

३.रिमा सहलीला जाणार.

४.चंदा लाडू खात आहे.

५.माझ्या घरी पार्टी झाली.

**Q. 11 जोड्या जुळवा** **[3]**

| | | |
|---|---|---|
| १. जवळून | टणक | ( ) |
| २. छोट्या | अहित | ( ) |
| ३. जिवंत | मोठ्या | ( ) |
| ४. शहाणे | वेडे | ( ) |
| ५. मऊ | दुरुन | ( ) |
| ६. हित | मृत | ( ) |

**Q.12 एका वाक्यात उत्तरे लिहा. (Any 6)** **[1x6 =6]**

१. कवयित्रिला सूर्यकिरण का व्हावेसे वाटते?

२. चंद्रावरची शाळा कोणत्या शतकात भरेल?

३. घर बांधण्यासाठी कोणकोणत्या वस्तू लागतात?

४. अप्पाजींनी बैलगाडीत कशाचे पीक घ्यायला लावले?

५. चुना  कशा पासून तयार करतात?

६. उत्कृष्ट दर्जाची मुर्ती कोणती?

७. चंद्रावरच्या शाळेत अभ्यास कसा करावा लागेल?

**Q.13 थोडक्यात उत्तरे लिहा. (Any 2) [2x2=4]**

१. चंद्रावरच्या शाळेत पास केव्हा केले जाते?

२. लेखिकेच्या मते, मातृभुमी बद्दल प्रेमभाव का बाळगावा?

३. अप्पाजींच्या मते उत्तम माणूस कोणता?

**Q. 14 खालील उतारा वाचा आणि प्रश्नांची उत्तरे लिहा. (1x5=5)**

होळी आली होळी आली
खावी पुरणाची पोळी,
झाडे ,फांद्या तोडू नका,
केर कचरा खड्ड्यात टाका
होळी आली होळी आली
भरा सद्गुणांची झोळी,
अनिष्ट रुढी , प्रथांची
बांधू होळी साठी मोळी.
होळी आली होळी
ठेवू पर्यावरणाचे भान,
नका तोडू वृक्ष राजी
घ्यावी आज अशी आण.
होळी आली होळी
पळून गेली दूर थंडी,
ऊन आता लागलय वाढू
काढा कपाटातून बंडी.
होळीचा हा सण असा
जो कोणी साजरा करील.
निसर्गराजा त्याच्या घरी
स्वतः येऊन पाणी भरील.

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. कशाची पोळी खावी?

२. कशाची आपण बांधू मोळी?

३. बंडी का काढा कपाटातून?

४. कोण त्याच्या घरी स्वत: येऊन पाणी भरील?

५. या कवितेच्या कवीचे नाव काय आहे?

## Q. 15 खालील अपठीत उतारावाचून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. [5]

नदीच्या तटावर अत्री ऋषींचा आश्रम होता. त्या आश्रमात अनेक शिष्य विद्या शिकायला येत असत.त्यांचे शिक्षण संपले कि ते गुरूंचे आशीर्वाद घेऊन घरी जायचे.एकदा तीन शिष्यांचे शिक्षण पूर्ण झाले.त्या तीनही शिष्यांनी स्वत:च्या घरी जाण्याची तयारी केली. घरी जाण्यापूर्वी ते गुरुंचे आशीर्वाद घ्यायला गेले.

गुरुच्या पाया पडून ते म्हणाले , " गुरुदेव, आम्हाला आशीर्वाद द्या . आम्हाला घरी जाण्याची परवानगी द्या." गुरुनी आशीर्वाद दिला व म्हणाले "तुम्ही उद्या घरी जा ."आपण दिलेली विद्या शिष्य नीट शिकले आहेत,की नाहीत हे जाणून घेण्यासाठी गुरुजीनी त्यांची परिक्षा घेण्याचे ठरवले.

दुस-या दिवशी गुरूजी सकाळी लवकर उठले व थोडे काटे जमवून आश्रमच्या फाटकाजवळील रस्त्यावर पसरून ठेवले आणी जवळपास लपून बसले.

प्रश्न:

१ .नदीच्या तटावर कोणाचा आश्रम होता?

२. गुरुजीनी शिष्यांची काय घेण्याचे ठरवले.?

३. आश्रमच्या फाटकाजवळील रस्त्यावर गुरुजींनी काय पसरून ठेवले ?

४. आश्रमातील किती शिष्यांचे शिक्षण पुर्ण झाले?

५. वचन बदला १. नदी २. घर

---

## Q.16 पत्र लिहा. [5]

दिवाळीच्या सुट्टीत आपल्या मित्राला घरी आमंत्रण देणे